नि.फौ.ख.क्र.१३१/२०१६
नि.क्र.६१

**दोषारोप पुर्वीचा पुरावा**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.०२ चा सरतपास–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नावः | – | कमलाकर बाबुराव सुर्यवंशी, |
| वय | – | ६४ वर्षे, व्यवसाय– सेवानिवृत्त, |
| राहणार | – | बँक कॉलनी, निलंगा ता. निलंगा, जि. लातूर. |

**फिर्यादी तर्फे साक्षीदाराचा सरतपास विधीज्ज्ञ श्री. एस. व्ही. सांळुके यांचे मार्फत सुरुः–**

१. आरोपी क्र.१ ते ५ यांना मी ओळखतो. आरोपी क्र.१ माझे जावाई आहेत. आरोपी क्र.२ माझे व्याही आहेत. आरोपी क्र.३ माझे विहीन आहेत. आरोपी क्र.४ हे माझ्या मुलीचे दिर आणि ५ ही ननंद आहे. दिनांक २३/०५/२०१३ रोजी आरोपी क्र.१ आणि माझी मुलगी रोहिणी यांचा विवाह झाला होता. ते लग्न मी खर्च करुन दिले होते. मी आरोपींनी १,५१,०००/– वर दक्षिणा, ३ तोळे सोण्याचे दागिणे आणि इतर संसार उपयोगी वस्तू दिल्या होत्या. त्या करीता मला माझा ५,००,०००/– रुपये खर्च झाला होता. लग्नानंतर माझी मुलगी आरोपींच्या घरी पुणे येथे नांदण्यास गेली. सुरुवातीचे दोन महिणे तिला व्यवस्थीत नांदवले. आषाढ महिण्यात ती माहेरी आली. आरोपी क्र.५ ने मला फोन करुन रोहिणीला लातूर येथे सोडा मी तिला पुण्याला घेवून जाते असे मला सांगीतले. मी अचानक आलेल्या फोन मुळे तिच्या जाण्याची व्यवस्था करु शकत नाही, मुलासोबत तिच्या सासरी पाठवतो असे सांगीतले. मी तिला मुलासोबत सासरी पाठवले. माझ्या मुलीला आरोपी क्र.५ सोबत का पाठवले नाही म्हणूण सर्व आरोपींनी तिला शिवीगाळ केली आणि त्रास देण्यास सुरुवात केली. तिचा मानसीक छळ केला. माझ्या मुलीकडे त्यांनी रायसरोल कंपनीची जागा खरेदी घेण्याकरीता ५,००,०००/– रुपये आणावेत अशी मागणी केली. माझ्या मुलीने सुरुवातीला त्या मागणी बाबत काही सांगीतले नाही. सन २०१३ मधील दिवाळी सनाकरीता राहिणी माहेरी आल्यानंतर तिने मला आरोपी

तिच्याकडे मागणी करत असलेल्या रक्कमेबद्दल सांगीतले. मी आरोपींच्या नातेवाईकांना माझ्या मुलीला देत असलेल्या त्रासाबद्दल सांगीतले. त्यामूळे आरोपी माझ्या मुलीला घेण्यास आले नाहीत.

२. दिनांक ०२/०१/२०१४ रोजी मी आणि माझा मावस भाऊ विलास शिंदे राहिणीला घेवून तिला सोडण्यासाठी सासरी गेलो. त्यावेळी आरोपींनी माझ्याकडे ५,००,०००/- रुपयाची मागणी केली. मी त्यांना अजून लग्नाचे कर्ज फिटले नाही, दोन वर्षानंतर २,००,०००/- रुपये देतो माझ्या मुलीला व्यवस्थीत सांभाळा अशी विनंती केली.

३. आरोपींनी माझ्या मुलीला शारीरीक व मानसीक त्रास देण्यास सुरुवात केली. आरोपी माझ्या मुलीला उष्टे खायला देत होते, एका पायावर उभे करत, मोलकरणी सारखे रहा असे म्हणत होते. आरोपी क्र.१ तिला लग्नापुर्वी ठेवलेली बाई सोडणार नाही असे म्हणत होता. सन २०१४ मधील पाडव्याच्या सनावेळी आरोपींनी रोहिणीला लाथा-बुक्यांनी मारहाण केली, माहेरी बोलण्यास बंदी घातली. त्यामूळे दिनांक २०/०८/२०१४ रोजी माझ्या मुलाला राहिणीच्या सासरी पाठवले होते. त्यावेळी राहिणीला व माझ्या मुलाला आरोपींनी मारहाण केली आणि त्यांना घरातून हाकलून दिले. पोलिस स्टेशनमध्ये मारहाणी बद्दल तक्रार दिल्यास कारखाली चिरडून टाकू अशी आरोपींनी धमकी दिली. त्यानंतर राहिणी माझ्याकडे आली. डिसेंबर २०१४ व फेब्रूवारी २०१५ मध्ये माझ्या नातेवाईकांच्यासह आरोपीच्या घरी समजावण्यासाठी मी गेलो होतो. तेंव्हा आरोपींनी धमकी देवून ५,००,०००/- रुपयाची मागणी केली. त्यानंतर आम्ही निलंगा येथे परत आलो.

४. दिनांक १९/०५/२०१५ रोजी आरोपी क्र.२ चे मावस भाऊ विवेक जाधव, विलास शिंदे, मी, माझे वडील आणि रोहिणी आरोपींना भेटण्यास गेलो होतो. तेंव्हा आरोपी क्र.१ व २ यांनी २,००,०००/- रुपये आणि ५ तोळे सोण्याची मागणी केली. मी आरोपी क्र.१ व २ यांना फोन

केला होता. त्यांनी माझे ऐकून न घेता मला जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपी क्र.३ ते ५ यांनी माझ्या मुलीला तुझ्या डोळ्यात मिरची टाकून मारु अशी धमकी दिली. माझ्या मुलीने देहू रोड आकुर्डी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार नोंदवली.

५. दिनांक २२/०५/२०१५ रोजी आरोपींनी माझ्या मुलीला फोन करुन आर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्यामूळे दिनांक २२/०५/२०१५ रोजी आम्ही लातूर महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये अर्ज केला. पोलिसांनी आरोपींना समजावण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर पोलिस स्टशनला पत्र दिले होतू परंतु पोलिसांनी काहीच कारवाई केली नाही.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास करीता आरोपी व आरोपींच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.02.25 16:24:24 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**
**जिल्हा लातूर.**
**(न्यायालय क्र.०१)**

**दिनांकः–२५/०२/२०२६.**
**ठिकाणः–निलंगा**